**"नाटयसंज्ञा कोश" या प्रकल्पास मान्यता**
**व खर्चास मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मसाअ १०११/ प्र.क्र.४८/ भाषा-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक २० सप्टेंबर, २०११

**शासन निर्णय :-** जेष्ठ संशोधक श्री.विलास खोले यांनी प्रस्तावित केलेला "नाटयसंज्ञा कोश" विदयालये, महाविदयालये, विद्यापीठे यांतील अध्यापकवर्ग व विदयार्थी, नाटयशिक्षण देणारे महाराष्ट्रातील वेगवेगळे विद्यापीठीय विभाग व नाटयसंस्था यांना तसेच नाटयरसिकांना निश्चितपणे उपयुक्त ठरणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पात नाटकाच्या आकलनासाठी, विश्लेषणासाठी आणि मूल्यमापनासाठी वापरल्या जाणा-या संज्ञा समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. "नाटयसंज्ञा कोश" कोशवाड.मयात मोलाची भर घालण्यास सक्षम ठरणार आहे. तसेच सदर प्रकल्पाचे स्वरुप व कालावधी लक्षात घेता हा प्रकल्प श्री.विलास खोले यांच्याकडे सोपविण्यात येऊन सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे व त्याकरीता मानधनापोटी रुपये २,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. विचारांती शासन, या शासन निर्णयान्वये "नाटयसंज्ञाकोश प्रकल्पाकरीता" रुपये २,००,०००/- ( रुपये दोन लक्ष फक्त) इतके अर्थसहाय्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करीत आहे :-

(अ) नाटयसंज्ञा कोश प्रकल्पाच्या लेखनासाठी दीड वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.

(ब) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्रकल्पाच्या लेखनाबाबत श्री.विलास खोले यांच्याबरोबर करार करावा व कराराच्या वेळेस त्यांना नाममात्र मानधन देण्यात यावे व जसजसे लेखन मंडळाला प्राप्त होईल त्याप्रमाणे तसतशी मानधनाची रक्कम अदा करण्यात यावी.

(क) नाटयसंज्ञा कोश प्रकल्पांची मुद्रणप्रत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या ताब्यात आल्यानंतर छपाईसाठीचा योजनेत्तर खर्च त्या त्या वर्षासाठी "प्रकाशने" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर प्रकल्पासाठीचा या वित्तीय वर्षातील रुपये २,००,०००/- इतका होणारा खर्च, "मागणी क्रमांक झेडएफ-०२, २२०५,कला व संस्कृती (००) १०२ कला व संस्कृती प्रचालन, (०१) योजनेत्तर योजना (०१), राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३१७ २) १६ - प्रकाशने" या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मंजूर तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा. उर्वरीत

मानधनावरील खर्च हा सन २०११ - २०१२ या वित्तीय वर्षात सदर लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(संगणक संकेतांक क्र - २०१२१२१०१६३२०४४०३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**( किशोर रा.कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
निवड नस्ती (भाषा-३)